लोकमत

# विद्यापीठाकडून ६८० परीक्षांचे वेळापत्रक रद्द

## परीक्षा व मूल्यमापन मंडळाचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने उन्हाळी सत्रात होणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या ६८० परीक्षांचे वेळापत्रक बुधवारी रद्द केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने हा निर्णय घेतला आहे.

उन्हाळी सत्रात होणाऱ्या बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. बीसीए, बीबीए, एमबीए अशा विविध अभ्यासक्रमांच्या ६८० परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केले. या परीक्षा २७ मार्चपासून नियोजित केल्या होत्या. मात्र, राज्य शासन आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आदेशानुसार कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून विद्यापीठाने या परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित केल्या. राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने राज्यातील सर्व विद्यापीठांच्या स्थगित केलेल्या परीक्षा घेण्याचे नियोजन करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दोन दिवसांपूर्वी सहा सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. या समितीने अहवाल दिल्यानंतर या परीक्षा घेण्याबाबत फेरनियोजन होईल. त्यानुसार नवे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.

### संभ्रमावस्था संपली

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरुवातीला विद्यापीठाने या परीक्षा १ एप्रिलपर्यंत लांबणीवर टाकल्या होत्या. पुन्हा राज्य शासनाच्या आदेशानुसार १४ एप्रिलपर्यंत या परीक्षा स्थगित केल्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे परीक्षा कधी सुरु होणार याबाबत संभ्रमावस्था होती. त्यांच्याकडून याबाबत वारंवार चौकशी करण्यात येत होती. आता पूर्वीचे वेळापत्रक रद्द झाल्याने संभ्रमावस्था संपली आहे.

# शिवाजी विद्यापीठ वसतिगृह ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोविड-१९ तथा कोरोना विषाणूच्या साथ-संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने आपत्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून कोरोनाबाधित रुग्णांसाठी एक हजार क्षमतेचे बेडचे रुग्णालय तयार करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ परिसरातील सर्व मुला-मुलींची वसतिगृहे वापरण्याचे नियोजित केले आहे.

पहिल्या टप्प्यात ५०० खाटांचे रुग्णालय करण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाकडील मुला-मुलींची वसतिगृहे ताब्यात घेण्यात आली आहेत. या वसतिगृहांत राहणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे खोलीतील साहित्य एकत्रितपणे खोलीनिहाय विद्यापीठ आपल्या ताब्यात ठेवणार आहे. यासाठी समिती तयार करण्यात आली आहे. या साहित्याची योग्य ती दक्षता घेतली जाणार असून हे साहित्य सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना त्याचे साहित्य परत मिळण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात येणार असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी कळविले आहे.

## राज्यपालांच्या कुलगुरूंना सूचना

# राज्यात सर्व विद्यापीठांच्या सामायिक परीक्षा घेण्याचा विचार करावा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई–** करोना साथरोगाच्या फैलावामुळे राज्यातील सर्व विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या आहेत. त्यात वेळ बराच गेला आहे. त्यामुळे करोना स्थितीचा आढावा घेऊन, राज्यातील सर्व विद्यापीठांच्या सामायिक म्हणजे एकाच वेळी परीक्षा घेता येतील का, याचा विचार करावा, अशा सूचना राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी यांनी कुलगुरूंना केल्या आहेत.



करोना साथरोगामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षांचे काय करायचे, याबाबत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी त्यांच्या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विद्यापीठांच्या कुलगुरूंशीही त्यांनी चर्चा केली. त्यानंतर करोनाच्या स्थितीचा आढावा घेऊन विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षांचे नियोजन, नियंत्रण व नवे वेळापत्रक तयार करणे, यासाठी कुलगुरूंची व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक समिती स्थापन केली. ही समिती सर्व परिस्थितीचा अभ्यास करून विभागाला अहवाल सादर करणार आहे.

करोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या रखडलेल्या परीक्षा तसेच विद्यापीठ स्तरावरील इतर प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी राज्यपालांनीही मंगळवारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला व विविध विषयांवर चर्चा केली. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे राज्यपालांनी कुलगुरूंना सांगितले. विद्यापीठांच्या स्थगित केलेल्या परीक्षा सामायिक पद्धतीने घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी देखील व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या या बैठकीत सहभाग घेतला. राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा सामायिकपणे घेता येतील का, याचा अभ्यास करून शासनाला अहवाल सादर करण्यासाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर तसेच एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरूंची समिती गठीत केली असून समिती लवकरच आपला अहवाल सादर करणार असल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली.

### विद्यापीठांची सामाजिक जबाबदारी

विद्यापीठांनी आपल्या आकस्मिक निधीचा वापर करोना परीक्षण प्रयोगशाळा सुरू करणे, मास्क व सॅनिटायझर निर्मिती तसेच इतर समाजोपयोगी साहित्य तयार करण्यासाठी करावा, असे राज्यपालांनी सांगितले. व्हर्च्युअल क्लास रूम तसेच तंत्रज्ञानावर आधारित इतर ऑनलाइन सुविधांच्या मदतीने विद्यापीठांनी अध्यापनाचे कार्य सुरू ठेवावे, तसेच प्रत्येक विद्यापीठाने आपापल्या परिसरामध्ये स्थलांतरित कामगार, बेघर व निराश्रित लोकांना भोजन सुविधा देण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना त्यांनी केल्या. विद्यापीठांच्या कुलगुरूंनी आपल्या वेतनाचा काही भाग शासनाला योगदान म्हणून देता येईल का, याचा विचार करावा असे आवाहन राज्यपालांनी केले.

# तंत्रज्ञान अधिविभागाची वसतिगृहे अधिग्रहणासाठी उपलब्ध करणार : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोनाच्या अनुषंगाने उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देताना शिवाजी विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभागाचे वसतिगृह अधिग्रहणासाठी उपलब्ध करून दिले आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे या व्यवस्थेचे समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहत आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची दि. १ एप्रिल रोजी सकाळी विद्यापीठाच्या अतिथीगृहात जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्यासमवेत सविस्तर चर्चा झाली. त्यांनी विद्यापीठातील विविध वसतिगृहांची अधिग्रहणाच्या अनुषंगाने पाहणी केली. त्यानंतर त्यांची कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्यासमवेत चर्चा झाली.

जिल्हाधिकारी देसाई यांनी कोरोना विषाणूबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त दक्षतेचा उपाय म्हणून उपचारासाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने वसतिगृहांचे अधिग्रहण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

त्यावर कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या विविध वसतिगृहांत सुमारे ३ हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी राहतात. लॉकडाऊन उठवल्यानंतर अर्थात १५ एप्रिलनंतर हे विद्यार्थी स्थगित केलेल्या परीक्षांसाठी पुन्हा वसतिगृहांत दाखल होतील. त्यांची पर्यायी निवास व भोजन व्यवस्था करणे अशक्य असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. त्यानंतर जिल्हाधिकारी देसाई यांनी अतिरिक्त पर्यायी व्यवस्था म्हणून तंत्रज्ञान अधिविभागाकडील विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहे अधिग्रहणासाठी उपलब्ध करण्याविषयी सांगितले. त्याला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी संमती दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहांत मिळून एकूण ५०० बेडची व्यवस्था आहे. ही वसतिगृहे जिल्हा प्रशासनाला अधिग्रहणासाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

दरम्यान, विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी, वसतिगृहांचे रेक्टर आदींशी चर्चा करून जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार सदर वसतिगृहे हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने सर्व आवश्यक ती व्यवस्था करण्याच्या सूचना कुलगुरूंनी कुलसचिवांना केल्या.

# वेळापत्रक रद्द

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा १५ मेपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. या परीक्षा २७ मार्चपासुन सुरू होणार होत्या, मात्र करोना प्रादुर्भावच्या पार्श्वभूमीवर या परीक्षा १४ एप्रिल पर्यंत स्थगित करण्यात आल्या



होत्या. दरम्यान अद्यापही करोना संसर्गांचा धोका कमी न झाल्याने नियोजित वेळापत्रक रद्द करण्यात आले असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन विभागाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी तसेच उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी परीक्षांच्या नियोजनाबाबत गेल्या दोन दिवसात चर्चा करून त्यानंतर निर्णय घेण्यात आला.

# थोडक्यात

## तंत्रज्ञान होस्टेलमध्ये आयसीयू आयसोलेशन

कोल्हापूर : करोना विषाणूच्या संसर्गामुळे आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून कोरोनाबाधित रुग्णांसाठी १००० बेड क्षमतेचे (आयसीयू आयसोलेशन) रुग्णालय सुरू करण्याची तयारी शिवाजी विद्यापीठ केली आहे. परिसरातील सर्व मुलामुलींची वसतिगृहे यासाठी वापरली जातील. ५०० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाकडील मुलामुलींची वसतिगृहे अधिग्रहित करण्यात येत आहेत. तंत्रज्ञान अधिविभागाच्या वसतिगृहांतील विद्यार्थी -विद्यार्थिनींचे साहित्य स्थलांतरित केल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

## माझी फोटोग्राफी

प्रफुल्ल सप्रे यांनी छायांकित केलेला मनोहारी सूर्यास्त.



# शिवाजी विद्यापीठ परीक्षांच्या तारखा नंतर जाहीर करणार

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रद्द केलेल्या परीक्षा, नव्याने घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या तारखा प्रशासनातर्फे जाहीर करण्यात येतील, असे शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे. विद्यापीठातर्फे मार्च व एप्रिल महिन्यांत तोंडी, लेखी तसेच प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक यापूर्वी जाहीर केले होते; पण आता ते रद्द करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या पुढील आदेशानंतर नव्याने विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा तारखा जाहीर करण्यात येतील.

# विद्यापीठ परीक्षांचा निर्णय १५ नंतर

**कोल्हापूर, ता. ८ :** कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केलेल्या टाळेबंदीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या एप्रिल-मेमध्ये होणाऱ्या सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यावर नवीन वेळापत्रक आखले जाईल. त्यानुसार परीक्षा होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा, प्रात्यक्षिके एप्रिल-मे या कालावधीत होणार होते. मात्र, कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभर टाळेबंदी करण्यात आली. त्यामुळे राज्यातील सर्वच महाविद्यालये, विद्यापीठे बंद ठेवण्यात आली. त्यामुळे या परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले. आता हे वेळापत्रक रद्द करण्यात आले असून, त्यानुसार होणाऱ्या परीक्षा, प्रात्यक्षिके होणार नाहीत. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राज्यातील सात कुलगुरुंची एक समिती नेमली असून, या समितीचा अहवाल आल्यानंतर त्यानुसार नवीन वेळापत्रक ठरविले जाईल. त्यानुसार परीक्षा होतील, असे परीक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

# SUK starts counselling facility for Covid-19

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: Shivaji University, Kolhapur, (SUK) has re-introduced its counselling facility for the citizens in view of Covid-19 outbreak across the country.

University registrar, Vilas Nadavadekar, in a press statement, said that they have started with the facility considering the need for it.

Amol Minchekar, the coordinator of the counselling facility, said that they have implemented a team of 30 students and faculty members for the counselling purpose. The students are from the Master of Social work (MSW) faculty.



Minchekar said that they are receiving fewer calls daily, but the nature of calls is something which shows how the pandemic and lockdown has affected citizens.

He said, "We are not going for therapy here. The purpose of the counselling facility is to provide emotional support to the caller. In the last few days, we have got calls from students, working professionals and even the family members of the health workers on how they are concerned about their family members or about the employment."

Devanand Shinde, vice-chancellor of the SUK, said that this is a citizen-friendly initiative and anybody feeling any negativity due to this should make most of the counselling facility.

Kalyani Kulkarni, a private counsellor said that in times like these, the rise in insecurities, panic attacks and depression can be seen. People should work on their mental hygiene and look for positive motives in life which can work wonders for them.

# विद्यापीठातील उन्हाळी परीक्षा १४ एप्रिलनंतरच

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा १४ एप्रिलनंतर घेण्यात येणार आहेत. यापुर्वी तोंडी, लेखी, मैखिक परीक्षांचे प्रसिद्ध केलेले वेळापत्रक रद्द करण्यात आले आहे. परीक्षेच्या फेरनियोजनाबाबतची सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर १४ एप्रिलनंतर उपलब्ध होणार आहे. तरी विद्या-पीठातील अधिविभाग, महाविद्यालये, विद्यार्थ्यांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

